**निशाणी क्र. ३६ पुढे सुरु....**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०२**

**मी प्रतिज्ञापुर्वक सत्य निवेदन करते की,**

**माझे नाव –** पंढरी ग्यानोबा गुळवे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१, २ व ४ तर्फे विधीज्ञ श्री. बी. डी. जाधव यांच्यामार्फत पुढे सुरु...**

**१०.** दावा मिळकत मुळ माझ्या मालकीची होती व आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत मुळ पंढरी घोगरे यांची होती, ती सन १९६९ साली प्रतिवादी क्र.४ चे वडील पांडुरंग कांबळे यांनी खरेदी केली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ च्या वडीलांनी दावा मिळकत खरेदी डेबुक क्र.१०२३/१९६९ अन्वये खरेदी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत सन १९७४ साली पांडुरंग कांबळे यांच्याकडुन माझ्या वडीलांनी खरेदी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००४ मध्ये दावा मिळकत माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र.३ यांना विक्री केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र.३ यांना डेबुक क्र.९९५/२००४ अन्वये दावा मिळकत खरेदी दिली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, ते खरेदीखत फेर बैनामा होते. फेर बैनाम्याचे वेगळा कागद केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आमची वडीलोपार्जित जमीन नाही. प्रतिवादी क्र.३ च्या हक्कामध्ये खरेदीखतानंतर ७/१२ उतारा झाला होता किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र.३ च्या हक्कात जे खरेदी खत करून दिले त्यापुढे त्यांचा व त्यांच्या वारसांचा जमीनीवर हक्क राहणार नाही असे नमूद केलेले आहे. आम्ही दावा मिळकत प्रतिवादी क्र.३ कडुन वापस घेतलेली आहे. जमीन वापस घेतल्याचा दस्त मी दाखल करू शकत नाही.

**११.** दावा मिळकतीच्या दक्षिणेकडे प्रतिवादी क्र.४ च्या वडीलांची जमीन आहे. प्रतिवाद क्र.३ च्या हक्कात फेरफार होताना आम्ही त्यावर आक्षेप घेतलेला नाही. वाटणीची निश्चित तारीख मला सांगता येत नाही. त्या वाटणीला संभाजी दगडोबा कांबळे, मंच्छींद्र केरबा कांबळे ही दोन माणसं हजर होती. आम्हाला वडीलोपार्जित सर्वे नं.१६

मध्ये २ एकर ५ गुंठे, गट नं.४३५ मध्ये साडे सहा एकर, गट नं.१२ मध्ये ४ एकर, गट नं.२ मध्ये ३ एकर अशा होत्या. त्या सर्व जमीनींच्या चतुःसिमा मला सांगता येतात. दावा जमीनीच्या पश्चीमेकडे – गंप्पु जाधव याची जमीन, उत्तरेकडे – मच्छींद्र कांबळे यांची जमीन, दक्षिणेकडुन – पांडुरंग कांबळे व पुर्वेस – आनंद मच्छींद्र कांबळे याची जमीन आहे. गट नं.४३५ च्या उत्तरेकडे – संभाजी कांबळे यांची जमीन, पुर्वेकडे – नारायण महामरेवाड यांची जमीन, पश्चिमेकडे – मच्छींद्र कांबळे यांची जमीन व दक्षिणेकडे – तुकाराम रोकडे याची जमीन आहे. गट नं.१२ च्या उत्तरेकडे – विठ्ठलराव घोगरे यांची जमीन, पुर्वेकडे – पूर्वेकडे भिमराव कांबळे यांची जमीन, पश्चिमेकडे – नागेशराव माकणे यांची जमीन व दक्षिणेकडे – प्रकाश कांबळे याची जमीन आहे. गट नं.२ च्या उत्तरेकडे – प्रकाश कांबळे यांची जमीन, पुर्वेकडे – प्रल्हाद माकणे यांची जमीन, पश्चिमेकडे – रस्ता व दक्षिणेकडे – बाबुराव याची जमीन आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ मध्ये प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकत विक्री केलेली आहे. आम्ही प्रतिवादी क्र.१ ला सन २०१२ मध्ये दावा मिळकत विक्री केल्याचा बैनामा मी दाखल करू शकत नाही. प्रतिवादी क्र.१ नाव दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याला लागताना मी आक्षेप घेतला होता. आम्ही प्रत्येक जागेवर अर्ज दिला. त्याच्या प्रती मी दाखल करू शकत नाही. आम्ही त्या खरेदीखताबाबत दावा दाखल केला होता. त्याचा केस नंबर मला सांगता येत नाही. त्या केसचा निकाल लागला किंवा कसे ते मला माहीत नाही.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, फेर बैनामा असा कोणताही दस्त नसतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन वापस घेण्याचे ठरले होते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची वादी क्र.१ कधीही ताबेदार नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत सन २०२२ – २३ पर्यंत प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या ताब्यात होती. प्रतिवादीने वादीला जिवे मारण्याची धमकी दिल्याबाबत वादीने पोलीसात तक्रार दिली होती किंवा कसे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ मध्ये आमच्यात वाटण्या झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सोयाबिनचे पिक घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की,

प्रतिवादी क्र. १ यांना दावा जमीनीचा ताबा दिलेला नाही असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळमत आजारोजी प्रतिवादी क्र.४ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ ने दावा मिळकतीमध्ये दोन बोअर व एक विहीर खोदली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ ने दावा जमीनीवर ऊसाचे पिक घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने दस्त क्र.४९६/२०२३ ने दावा मिळकत प्रतिवादी क्र.४ ला खरेदी दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीवर वादीचा ताबा असल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीनीशी वादीचा कसलाही हक्क संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आमच्या वडीलांच्या नावे असल्याचा गैरफायदा घेवून खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मदत व्हावी म्हणून मी खोटे शपथपत्र देऊन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रृवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.08.06 10:40:03 +0530

**दिनांक** – ०४.०८.२०२५.

**स्थळ–** अहमदपूर

(**स्वानंदी दे. वडगांवकर** )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.